नि.दि.दा.क्र. ९७/२०२५
मालुताई ..वि.. डब्ल्यु.सी.एल.
नि.क्र. २२ चा भाग

**वादीचा साक्षीदार क्र. २**

नावः खुशाल बबनराव वाघमारे,
वयः ५१ वर्षे, व्यवसायः खाजगी,
राहणारः मंगळवारी पेठ, नागपूर

**वादी यांच्या तर्फे साक्षीदार क्र.२ यांचा सरतपास विधीज्ञ कु. चिचघरे, यांच्या मार्फतः**

१. मी अभिलेखावर दाखल केलेले शपथपत्र हे माझ्या सांगण्याप्रमाणे लिहुन घेतले आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. ते **नि.२२** वर आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास प्रतिवादी यांचे तर्फे श्री. रघुते यांचे द्वारा.**

२. हे म्हणणे खरे आहे की, मालुताई उर्फ रत्नमाला असे कोणतेच दस्तऐवज अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, आधार कार्ड, पॅन कार्ड व ७/१२ वर मालुताई उर्फ रत्नमाला असे लिहीलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी देखील मालुताई उर्फ रत्नमाला असे दस्तऐवज तयार केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मालुताई हीच रत्नमाला आहे हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मालुताई व रत्नमाला हया दोन वेगवेगळया व्यक्ती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटे शपथपत्र दाखल केले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

**समक्ष,**

श्रवणोत्तर स्विकृत,

**( रा.भा. डोळे )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
उमरेड.

दिनांक : २०.०१.२०२६

नि.दि.दा.क्र. ९७/२०२५

**मालुताई ..वि.. डब्ल्यु.सी.एल.**

**नि.क्र. ११ चा भाग**

**वादीचा साक्षीदार क्र. १**

नावः मालुताई खुशाल वाघमारे,

वयः ३५ वर्षे, व्यवसायः घरकाम,

राहणारः मंगळवारी पेठ, नागपूर

**वादी यांच्या तर्फे साक्षीदार क्र. १ चा यांचा सरतपास विधीज्ञ कु. चिचघरे, यांच्या मार्फतः**

**१.** मी अभिलेखावर दाखल केलेले शपथपत्र हे माझ्या सांगण्याप्रमाणे लिहुन घेतले आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. ते **नि.११** वर आहे. मी अभिलेखावर खालील प्रमाणे दस्ताऐवज दाखल केले आहे. ते खालील प्रमाणे आहेत.

१. मी अभिलेखावर प्रतिवादीने दिलेल्या पत्राची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र. १५** देण्यात येते.

२. मी अभिलेखावर माझे आधार कार्ड दाखल केले आहे. त्यास **नि.क्र. १६** देण्यात येते.

३. मी अभिलेखावर माझे पॅन कार्ड दाखल केले आहे. त्यास **नि.क्र. १७** देण्यात येते.

४. मी अभिलेखावर शासन निर्णय / रापजपत्र दाखल केले आहे. त्यास **नि.क्र. १८** देण्यात येते.

५. मी अभिलेखावर माझ्या विवाहाच्या प्रमाणपत्राची प्रत दाखल केली आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. १९** देण्यात येते.

६. मी अभिलेखावर माझ्या शाळा सोडण्याचा दाखला दाखल केला आहे. त्यास **नि.क्र. २०** देण्यात येत.

७. मी अभिलेखावर ७/१२ दाखल केला आहे. त्यास **नि.क्र. २१** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**उलटतपास प्रतिवादी यांचे तर्फे श्री. रघुते यांचे द्वारा.**

२. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आधार कार्ड, पॅन कार्ड व ७/१२ वर मालुताई उर्फ रत्नमाला असे लिहीलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मालुताई किंवा रत्नमाला मीच आहे या दस्तऐवजा वरुन सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला जाहीर घोषणा मागण्याचा अधिकार नाही कारण माझ्याकडे कोणतेही दस्तऐवज नाही. हे म्हणणे खरे नाही की, मालुताई व रत्नमाला या दोन वेगवेगळया व्यक्ती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटे शपथपत्र दाखल केले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

**समक्ष,**

श्रवणोत्तर स्विकृत,

**( रा.भा. डोळे )**

दिनांक : २०.०१.२०२६

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

उमरेड